REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 1 | OCTOBER – 2017



# जात आणि विवाह : विवाह विषयक नोंदीचा विशेष अभ्यास

मार्गासिद्धा रामचंद्र पवार

**प्रस्तावना :**

जात ही भारतीय समाजाचे महत्वाचे मानले लक्षण आहे तसेच जाती अंतर्गत विवाह हे जातीचे सर्वात महत्वाचे लक्षण मानले जाते. भारतीय समाज ज्याप्रमाणे आधुनिक होईल तशा स्वरूपात जात आपोआप नाहीशी होईल अशी भूमिका कार्ल मार्क्स यांनी मांडली होती.[1]तर डॉ. आंबेडकरांनी जाती विषयी मांडणी करताना, हिंदू त्यांचे धर्मग्रंथ पवित्र मानतात म्हणून ते जातीत विवाह करतात म्हणून जात मोडायची असेल तर धर्मग्रंथाचे पावित्र्य नष्ट करणे आवश्यक आहे.[2]भारतीय राज्य घटनेचा उद्देश हाजातीचे महत्व संपविण्याचा आहेपरंतु भारताची राष्ट्र म्हणून सुरु असलेल्या वाटचालीत याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

औद्योगिकीकरणाचे अर्थकारण व कल्याणकारी राज्यसंस्थेच्या कार्य क्षेत्रात सर्व जातींच्या व्यक्तींचा मुक्त संपर्क घडत आहे त्यामुळे जात व जातीयवादी समाजव्यवहार संपला आहे या भूमिकेचा प्रतिवाद करताना विवाह व कुटुंब संस्थेच्या क्षेत्रात जात अजूनही महत्वाची भूमिका निभावते, वृत्तपत्रात छापून येणाऱ्या विवाहविषयक जाहिराती वाचल्या तरी जातीचे गांर्भीय लक्षात येईल.या अनुषंगाने सदर लेखामध्ये विवाहाविषयी जातीचे गांर्भीय पडताळून पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सदर संशोधनासाठी दैनिक लोकसत्ता या मराठी दैनिकाच्या पुणे आवृत्तीत छापून आलेल्या 248 विवाहविषयक जहिरातींचा आधार घेण्यात आला आहे. कारण दैनिक लोकसत्ता हे महाराष्ट्रातील शहरी, मध्यम वर्गीय जनसमूहात दखलपात्र वाचकवर्ग असलेले वृत्तपत्र म्हणून ओळखले जाते. त्यामुळे हा नमुना काही अंशी महाराष्ट्रातील शहरी, मध्यम वर्गीय जनसमूहाचे प्रतिनिधित्व करतो असे गृहित धरण्यात आले आहे. सदर अभ्यास सर्व हिंदू समाजाचा विवाहविषयक व्यवहार समजण्यास पुरेसा नसला तरी विवाह व्यवहारातील जातीविषयक बदलत्या मानसिकतेचे आकलन करण्यासाठी उपयुक्त आहे असे वाटते.

सदर अभ्यासात लिंग,वय, जात, आर्थिक उत्पन्न किंवा वर्ग,शिक्षण व वैवाहिक दर्जा यानुसार विवाहासाठी जातीची निवड करण्याचे प्रकार याचे विश्लेषण केले आहे.

## लिंगआणिलग्नासाठीजातीचीनिवड :

### तक्ता क्र. 1 : लिंग आणि लग्नासाठी जातीची निवड

| लिंग | जातीचे पर्याय | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | जातीअंतर्गत | आंतरजातीय | उच्च जातीमध्ये आंतर जातीय | |
| पुरूष | 44 | 42 | 30 | 116 |
| | 37.9% | 36.2% | 25.9% | 100.0% |
| महिला | 68 | 47 | 17 | 132 |
| | 51.5% | 35.6% | 12.9% | 100.0% |
| एकूण | 112 | 89 | 47 | 248 |
| | 45.2% | 35.9% | 19.0% | 100.0% |

अभ्यासाठी निवडलेल्या 248 नमुन्यापैकी 116 (46.8%) पुरुष आहेत तर 132(53.2%)महिला आहेत. 116 पुरुषांपैकी 37.9 % पुरुषांनी जातीतच विवाह करण्याची इच्छा आहे तर 25.9% पुरुषांनी स्व-जातीत किंवा उच्चजातीतविवाह करण्याची इच्छा आहे तर 36.2 % पुरुषांनी कोणत्याही अन्य जातीत विवाह करण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे.

132महिलांपैकी 51.5% महिलांनी जातीतच विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली आहे तर 12.9% महिलांनी स्व-जातीत किंवा उच्चजातीत विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली आहे तर 35.6% महिलांची कोणत्याही अन्य जातीत विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. स्त्री - पुरुषांचा एकत्रित विचार केला तर 248 स्त्री-पुरुषांपैकी 45.2% स्त्रीपुरुषांनी जातीतच विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली आहे तर 19.0% स्त्रीपुरुषांची स्व-जातीत किंवा उच्चजातीत विवाह करण्याची इच्छा आहे तर 35.9% स्त्रीपुरुषांची कोणत्याही अन्य जातीत विवाह करण्याची इच्छा आहे.

सदर निरीक्षणावरून असे म्हणता येईल की स्व-जातीत विवाह करण्याचे महिलांचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक आहे. कोणत्याही अन्य जातीत विवाह करण्याचे प्रमाण स्त्री व पुरुषांमध्ये जवळपास सारखेच असल्याचे दिसून येते.उच्चआंतरजातीय विवाह करण्याची इच्छा स्त्रियांपेक्षा पुरुषांमध्ये अधिक आहे. एम.एन.श्रीनिवास यांच्या जातींच्या संस्कृतीकरणाच्या सिद्धांताच्या दृष्टीने उच्चआंतरजातीय विवाह करण्याची इच्छा पहिली तर ती जात लवचिक बनविणारी आहे परंतू जातीव्यवस्था मोडणारी नाही.

कोणत्याही अन्य जातीत विवाह करण्याची इच्छा असणारे स्त्रीपुरुषांचे प्रमाण समाजात ३५.९% आहे आणि स्त्री व पुरुषांमध्ये ते जवळपास सारखेच आहे ही बाब विश्लेषणासाठी येथे महत्वाची आहे.

## वयआणि लग्नासाठी जातीची निवड :

### तक्ता क्र.2 : वय आणि लग्नासाठी जातीची निवड

| वय | जातीचे पर्याय | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | जातीअंतर्गत | आंतरजातीय | उच्च जातीमध्ये आंतर जातीय | |
| 18-35 | 75 | 54 | 26 | 155 |
| | 48.4% | 34.8% | 16.8% | 100.0% |
| 36-50 | 34 | 34 | 16 | 84 |
| | 40.5% | 40.5% | 19.0% | 100.0% |
| 51-70 | 1 | 0 | 3 | 4 |
| | 25.0% | .0% | 75.0% | 100.0% |
| दर्शविले नाही | 2 | 1 | 2 | 5 |
| | 40.0% | 20.0% | 40.0% | 100.0% |
| एकूण | 112 | 89 | 47 | 248 |
| | 45.2% | 35.9% | 19.0% | 100.0% |

लग्नासाठी जातीची निवड करण्याबाबत वयाचा मुद्दा महत्वाचा असतो काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी निवडलेल्या नमुन्याची वर्गवारी १) वय वर्षे १८-३५, २) वय वर्षे ३६-५० व ३) वय वर्षे ५१-७०, अशी करण्यात आली आहे. वय वर्षे ३५ हे विवाहाच्या दृष्टीने मोठे वय मानले जाते .या वयात विवाह होणे कठीण बनते असा सर्वसाधारण मत प्रवाह असल्यामुळे वाढलेले वय हे आंतरजातीय विवाहाचा निर्णय घेण्याचे कारण असू शकते या गृहितकावर ही वर्गवारी आधारलेली आहे.

मुला – मुलींच्या शिक्षणाच्या प्रमाणात वाढ झाली असल्यने व समाजात वावरण्याची मोकळीक मिळाल्यामुळे वयाने मोठ्या असलेल्यांना कमी वयाचे व अविवाहित जोडीदार जातीतच मिळणे तुलनेने कठीण बनते,त्यामुळेदेखील आंतरजातीय विवाहाचा निर्णय घेण्याची शक्यता वाढते हे देखील या अभ्यासाचे एक गृहीतक आहे.एकूण २४८ विवाहेच्छू स्त्रीपुरुषांपैकी १५५ (६२.५ %) विवाहेच्छू १८–३५ या वयोगटातील होते ,८४ (३३.९%) विवाहेच्छू ३६–५० या वयोगटातील होते तर ०४ (१.६%) विवाहेच्छू ५१–७० या वयोगटातील होते.०५ (२.०%) विवाहेच्छूनी आपले वय सांगितले नाही.

१८–३५ या वयोगटात जातींतच विवाह करण्याची इच्छा असलेल्या विवाहेच्छूचे प्रमाण (४८.४%) त्यांच्या वयोगटातील उच्च आंतरजातीय (१६.८ %) व कोणत्याही जातीत (३४.८ %) विवाह करण्याची तयारी असलेल्या विवाहेच्छूपेक्षा अधिक आहे . ३६–५० या वयोगटात जातींतच विवाह करण्याची इच्छा असलेल्या विवाहेच्छूचे प्रमाण (४०.५ %) १८–३५ या वयोगटातील जातींतच विवाह करण्याची इच्छा असलेल्या (४८.४%) विवाहेच्छूकापेक्षा प्रमाण कमी आहे.३६–५० या वयोगटात कोणत्याही जातीत विवाह करण्याची इच्छा असलेल्या विवाहेच्छूचे प्रमाण (४०.५ %) १८–३५ या वयोगटातील कोणत्याही जातीत विवाह करण्याची इच्छा असलेल्या (३४.८ %) विवाहेच्छूकापेक्षाअधिक आहे.

### जातआणिलग्नासाठीजातीचीनिवड :

**तक्ता क्र.3.1 : जातआणिलग्नासाठीजातीचीनिवड ( Row %)**

| जात | जातीचे पर्याय | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | जातीअंतर्गत | आंतरजातीय | उच्च जातीमध्ये आंतर जातीय | |
| सीकेपी | 5 | 4 | 7 | 16 |
| | 31.2% | 25.0% | 43.8% | 100.0% |
| भंडारी | 1 | 4 | 6 | 11 |
| | 9.1% | 36.4% | 54.5% | 100.0% |
| बौद्ध | 17 | 12 | 0 | 29 |
| | 58.6% | 41.4% | .0% | 100.0% |
| ब्राम्हण | 33 | 11 | 13 | 57 |
| | 57.9% | 19.3% | 22.8% | 100.0% |
| मराठा | 44 | 19 | 9 | 72 |
| | 61.1% | 26.4% | 12.5% | 100.0% |
| एकूण | 45.2% | 35.9% | 19.0% | 100.0% |

लग्नासाठी जातीची निवड करण्याबाबत वेवेगळ्या जातींमध्ये काही वेगळेपणा असतो काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी निवडलेल्या नमुन्याची जातीनुसार तसेच जातीगटानुसार वर्गवारी करण्यात आली आहे. सदरनमुन्यामध्येउच्य जाती, मराठा, इतर मागासवर्गीय, दलित (अनुसूचित जाती), बौद्ध, अनुसूचित जमाती, जैन अशी वर्गवारी केली आहे.

नमुन्यामध्ये समाविष्ठ असलेल्या ब्राह्मण,सीकेपी,वैश्यवाणीया जातींचा समावेश उच्यजातीमध्ये करण्यात आला आहे.मराठा ही जात उच्च जात असली तरी तिचे जात म्हणून वेगळे वैशीष्ट्य असल्याने या जातीचा स्वतंत्रपणे अभ्यास केला आहे. नमुन्या मध्ये समाविष्ठ असलेल्या आगरी,भंडारी,कासार, कोळी, कुणबी, लेवापाटील, न्हावी,आगरी, शिंपी,सोनार, सुतार,या जातींचा समावेश इतर मागास जातींमध्ये समावेश करण्यात आला आहे.धनगर ,वंजारी या जातीचा समावेश महाराष्ट्रात भटक्या जमातीत होत असला तरी संशोधनाच्या सोयीसाठी त्यांचा समावेशइतर मागास जातीमध्ये केला आहे.तसेच चांभार, ढोर, मातंग, यांचा समावेश अनुसूचित जाती या गटात केला आहे. धर्मांतरित बौद्ध समाजाचा समावेश अनुसूचित जाती या गटात होत असला तरी धर्मांतरामुळे या सामाजघटकाचा स्वतंत्रपणे अभ्यास केला आहे. नमुन्यामध्ये समाविष्ठ असलेल्या भोई, महादेव कोळी, या समाज घटकांचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यात आला आहे.

तक्ता क्र.3.2 जातआणिलग्नासाठीजातीचीनिवड( Row %)

| जात | जातीचे पर्याय | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | जातीअंतर्गत | आंतरजातीय | उच्च जातीमध्ये आंतर जातीय | |
| धनगर | 100.0% | .0% | .0% | 100.0% |
| कोळी | 100.0% | .0% | .0% | 100.0% |
| सुतार | 100.0% | .0% | .0% | 100.0% |
| मराठा | 61.1% | 26.4% | 12.5% | 100.0% |
| बौद्ध | 58.6% | 41.4% | .0% | 100.0% |
| ब्राम्हण | 57.9% | 19.3% | 22.8% | 100.0% |
| आग्री | 50.0% | 50.0% | .0% | 100.0% |
| कुणबी | 40.0% | 20.0% | 40.0% | 100.0% |
| मातंग | 33.3% | 66.7% | .0% | 100.0% |
| सीकेपी | 31.2% | 25.0% | 43.8% | 100.0% |
| चांभार | 28.6% | 71.4% | .0% | 100.0% |
| न्हावी | 25.0% | 75.0% | .0% | 100.0% |
| भंडारी | 9.1% | 36.4% | 54.5% | 100.0% |
| कोणतही जात नाही | 8.3% | 58.3% | 33.3% | 100.0% |
| कासार | .0% | .0% | 100.0% | 100.0% |
| कोकणी | .0% | .0% | 100.0% | 100.0% |
| महादेव कोळी | .0% | 100.0% | .0% | 100.0% |
| म. कोळी | .0% | 50.0% | 50.0% | 100.0% |
| भोई | .0% | 100.0% | .0% | 100.0% |
| ढोर | .0% | 100.0% | .0% | 100.0% |
| गवळी | .0% | 100.0% | .0% | 100.0% |
| गुरव | .0% | 100.0% | .0% | 100.0% |
| जैन | .0% | 100.0% | .0% | 100.0% |
| लेवापाटील | .0% | 100.0% | .0% | 100.0% |
| महार | .0% | 100.0% | .0% | 100.0% |
| शिंपी | .0% | 100.0% | .0% | 100.0% |
| सोनार | .0% | 100.0% | .0% | 100.0% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वैश्य वाणी | .0% | 50.0% | 50.0% | 100.0% |
| वंजारी | .0% | 100.0% | .0% | 100.0% |
| एकूण | 45.2% | 35.9% | 19.0% | 100.0% |

अभ्यासाठी निवडलेल्या २४८ नमुन्या पैकी ९४ (३७.९%) विवाहेच्छू उच्च जात गटाचे,६१ (२४.६%) मराठा जातीचे, ३३ (१३.३%) इतर मागास जातगटाचे, १५ ( ६.०%) अनु. जाती तर २८ (११.३%) बौद्ध आहेत. ११(४.४%) विवाहेच्छूकांनी आपली जात सांगितली नाही. जातीनिहाय विवाहेच्छूची आकडेवारी पाहता असे दिसते की,मराठा २९.० %, ब्राह्मण २३.०%,बौद्ध ११.७%, प्रभू ६.५% तर भंडारी ४.४% आहेत. म्हणजेच एकूण विवाहेच्छूकांपैकी ७५% विवाहेच्छूक या पाच जातीतीलच आहेत.

जातीनिहाय लग्नासाठी जातीची निवड पहिली तर असे दिसते की, मराठा जातीत जातींतर्गत विवाह करण्याची ईच्छाअसलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाण ६१.१%, उच्च आंतरजातीयविवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाण १२.५%, तर कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाण २६.४% इतके आहे.ब्राह्मण जातीत जातींतर्गत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाण ५७.९%,उच्चअंतरजातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूचे प्रमाण २२.८ % , तर कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूचे प्रमाण १९.३% आहे.प्रभू जातीत जातींतर्गत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूचे प्रमाण ३१.२%,उच्चअंतरजातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाण ४३.८%, तर कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूचे प्रमाण २५.०% आहे. भंडारी जातीत जातींतर्गत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूचे प्रमाण ९.१%,उच्चअंतरजातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूचे प्रमाण ५४.५% , तर कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूचे प्रमाण ३६.४% आहे. बौद्ध समाजात जातींतर्गत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाण ५८.६%,उच्चअंतरजातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूचे प्रमाण ०.०%, तर कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाण ४१.४% होते. **याचा अर्थ ब्राह्मण जातीत कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाण सर्वात कमी आहे. जातीचा सामाजिक दर्जा जसजसा कमी होतो तसतसे याचे प्रमाण वाढत जाते. बौद्ध समाजात याचे प्रमाण सर्वात जास्त आहे**. या पाच जातींशिवाय इतर जातींची नमुन्यालील संख्या अल्प असल्याने त्यांचे याबाबतीतील निष्कर्ष काढण्यात आलेनाहीत.

**असे असले तरी कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूचे प्रमाण सरासरी ३५.९% आहे ही बाब उल्लेखनीय आहे.**

**तक्ता क्र. 4 : जातगटआणिलग्नासाठीजातीचीनिवड ( Row % )**

| जातगट | जातीचे पर्याय | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | जातीअंतर्गत | आंतरजातीय | उच्च जातीमध्ये आंतर जातीय | |
| उच्च् जाती | 45 | 23 | 26 | 94 |
| | 47.9% | 24.5% | 27.7% | 100.0% |
| मराठा | 38 | 14 | 9 | 61 |
| | 62.3% | 23.0% | 14.8% | 100.0% |
| इतर मागास वर्गीय | 8 | 17 | 8 | 33 |
| | 24.2% | 51.5% | 24.2% | 100.0% |
| बौद्ध | 16 | 12 | 0 | 28 |
| | 57.1% | 42.9% | .0% | 100.0% |
| अन. जाती | 3 | 12 | 0 | 15 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (बौद्ध वगळून) | 20.0% | 80.0% | .0% | 100.0% |
| जैन | 0 | 3 | 0 | 3 |
| | .0% | 100.0% | .0% | 100.0% |
| अनुसूचित जमाती | 1 | 1 | 1 | 3 |
| | 33.3% | 33.3% | 33.3% | 100.0% |
| कोणतीही जात नाही | 1 | 7 | 3 | 11 |
| | 9.1% | 63.6% | 27.3% | 100.0% |
| एकूण | 112 | 89 | 47 | 248 |
| | 45.2% | 35.9% | 19.0% | 100.0% |

लग्नासाठी जातीची निवड करण्याबाबत वेगवेगळ्या जातीगटांतर्गत वेगळेपणा तपासला तर असे दिसते की,जातीअंतर्गत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचेप्रमाण सरासरी ४५.२%, आहे तरउच्चअंतरजातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूचे सरासरी प्रमाण १९.९%, तर कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे सरासरी प्रमाण ३५.९ % आहे.

मराठा जातीसह उच्च जाती गटात कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी आहे. बौद्ध,इतर मागासवर्गीय व अनु. जाती या जातगटात हे प्रमाण सरासरी पेक्षा अधिक असून हे प्रमाणक्रमाक्रमाने वाढते. अनु.जातीगटातहे प्रमाण अधिक आहे.जातींतर्गत विवाह करण्याची इच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाण मराठा,बौद्ध व उच्च जातगटात सरासरीपेक्षा अधिक आहे .असे असले तरी मराठा जातीत हे प्रमाण सरासरीपेक्षा अधिक म्हणजे ६२.३% इतकेआहे. त्या खालोखाल बौद्ध आहेत. इतर मागासवर्गीय व अनु.जाती या जातगटात हे प्रमाण सरासरी प्रमाणापेक्षा कमी असून ते क्रमाक्रमाने घटते.

**तक्ता क्र. 5 : वर्ग (उत्पन्नगाट) आणि लग्नासाठी जातीची निवड : ( Row % )**

| वर्ग (उत्पन्नगट) | जातीचे पर्याय | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | जातीअंतर्गत | आंतरजातीय | उच्च जातीमध्ये आंतर जातीय | |
| उच्च् वर्गीय | 11 | 19 | 11 | 41 |
| | 26.8% | 46.3% | 26.8% | 100.0% |
| मध्यम वर्ग | 58 | 40 | 13 | 111 |
| | 52.3% | 36.0% | 11.7% | 100.0% |
| उच्च मध्यम वर्गीय | 8 | 9 | 10 | 27 |
| | 29.6% | 33.3% | 37.0% | 100.0% |
| कनिष्ठ मध्यम वर्गीय | 33 | 16 | 11 | 60 |
| | 55.0% | 26.7% | 18.3% | 100.0% |
| सांगितले नाही | 2 | 5 | 2 | 9 |
| | 22.2% | 55.6% | 22.2% | 100.0% |
| एकूण | 112 | 89 | 47 | 248 |
| | 45.2% | 35.9% | 19.0% | 100.0% |

लग्नासाठी जातीची निवड करण्याबाबत वेगवेगळ्या वर्गात /उत्पन्न गटात काही वेगळेपणा असतो काय? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी निवडलेल्या नमुन्याची **वर्ग (उत्पन्न गट)** नुसार वर्गवारी केली आहे. सदर नमुन्यामध्ये रुपये

१०००० ते ३०००० उत्पन्न असलेल्या अथवा या समकक्ष नोकरी व्यवसाय असलेल्या घटकांना कनिष्ठ मध्यम वर्ग असे म्हटले आहे. रुपये ३१००० ते ७०,००० उत्पन्न असलेल्या अथवा या समकक्ष नोकरी व्यवसाय असलेल्या घटकांना मध्यम वर्ग असे म्हटले आहे. रुपये ७१००० ते १ लाख इतके उत्पन्न असलेल्या अथवा या समकक्ष नोकरी व्यवसाय असलेल्या घटकांना उच्च मध्यम वर्ग असे म्हटले आहे. तर रुपये १ लाख पेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या अथवा या समकक्ष नोकरी व्यवसाय असलेल्या घटकांना कनिष्ठ मध्यम वर्ग असे म्हटले आहे. ज्या घटकांनी आपले उत्पन्न स्पष्टपणे सांगितले नाही त्यांचे उत्पन्न त्यांच्या नोकरी व्यवसायावरून अथवा त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवरून अंदाजे ठरविण्यात आले आहे.

लग्नासाठी जातीची निवड करण्याबाबत वेगवेगळ्या वर्गात/उत्पन्न गटात असलेला वेगळेपणा तपासाला असता असे दिसते की, जातींतर्गत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे सरासरी प्रमाण ४५.२ % आहे, उच्चअंतरजातीयविवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाण सरासरी १९.९ %, तर कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे सरासरी प्रमाण ३५.९ % आहे.

जातींतर्गत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाणसरासरीच्या (४५.२ %) तुलनेत कनिष्ठ मध्यम वर्गीय व मध्यम वर्गीयांचे प्रमाण अधिक आहे तर उच्च मध्यम वर्गीय व उच्च वर्गीयांचे प्रमाण अल्प आहे. कोणत्याही जातीत विवाहकरण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे सरासरी प्रमाणाच्या(३५.९ %) तुलनेत कनिष्ठ मध्यम वर्गीय वर्गीयांचे प्रमाण कमी, मध्यम वर्गीय व उच्च मध्यम वर्गीयांचे सरासरी इतके आहे. तर उच्च वर्गीयांचे प्रमाण अधिक आहे.**यावरून वर्गीय दर्जा वाढला की जातीबाहेर विवाह करण्याची शक्यता वाढते असे म्हणता येते.**

### तक्ता क्र. 6 : शिक्षणआणिलग्नासाठीजातीचीनिवड :

| शिक्षण | जातीचे पर्याय | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | जातीअंतर्गत | आंतरजातीय | उच्च जातीमध्ये आंतर जातीय | |
| माध्यमिक व उच्च माध्यमिक | 5 | 7 | 2 | 14 |
| | 35.7% | 50.0% | 14.3% | 100.0% |
| पदवी | 27 | 13 | 10 | 50 |
| | 54.0% | 26.0% | 20.0% | 100.0% |
| पदव्युत्तर पदवी | 42 | 19 | 10 | 71 |
| | 59.2% | 26.8% | 14.1% | 100.0% |
| व्यावसायिक पदवी | 17 | 20 | 15 | 52 |
| | 32.7% | 38.5% | 28.8% | 100.0% |
| उच्च व्यवसायिक पदवी | 15 | 25 | 10 | 50 |
| | 30.0% | 50.0% | 20.0% | 100.0% |
| सांगितले नाही | 6 | 5 | 0 | 11 |
| | 54.5% | 45.5% | .0% | 100.0% |
| एकूण | 112 | 89 | 47 | 248 |
| | 45.2% | 35.9% | 19.0% | 100.0% |

लग्नासाठी जातीची निवड करण्याबाबत शैक्षणिक दर्जाचा काही परिणाम होतो काय? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी निवडलेल्या नमुन्याची शैक्षणिक दर्जानुसार वर्गवारी केली आहे.यात पदवीपूर्व,पदवी, पदव्युत्तर, व्यावसायिक पदवी व उच्च व्यावसायिक पदवी अशी वर्गवारी केली आहे.

शैक्षणिक दर्जानुसार विवाहासाठी जातीची निवड कशी होते हे तपासले असता असे दिसते की, जातीअंतर्गत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाणसरासरीच्या (४५.२ %) तुलनेत पदवी व पदव्युत्तर दर्जाचे शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण अधिक आहे.तरव्यावसायिक

पदवी धारकांचे प्रमाण अल्प तर उच्च व्यावसायिक पदवी धारकांचे प्रमाण तुलनेने अल्प आहे. पदवीपूर्व दर्जाचे शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण देखील सरासरीच्या तुलनेत अल्प आहे परंतु व्यावसायिक पदवी व उच्च व्यावसायिक पदवी धारकांपेक्षा अधिक आहे.

कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाणसरासरीच्या (३५.९ %) तुलनेतपदवी व पदव्युत्तर दर्जाचे शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण अल्प आहे.तरव्यावसायिक पदवी धारकांचे प्रमाण सरासरी इतके आहे तर उच्च व्यावसायिक पदवी धारकांचे व पदवीपूर्व दर्जाचे शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण अधिक आहे.

**शैक्षणीकदर्जाचापरिणामविवाहासाठीजातीचीनिवडकरतानाहोतोवशिक्षणानेजातीचेबंधनसैलहोतेअसेम्हणतायेते.असेअसलेतरी सर्वात कमी शिक्षण असेल तरीजातीचे बंधन सैल होते या निरीक्षणाचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.जातीचा परंपरागत दर्जा टिकविण्यासाठी उच्च शिक्षण आवश्यक आहे अशी मानसिकता निर्माण झाली आहे व ते नसेल तर कोणत्याही जातीत विवाह करण्याची मानसिकता तयार होते असे असेल तर या निरीक्षणातून समाजात शिक्षणाचे वाढलेले महत्व लक्षात येते असे म्हणता येईल .**

**तक्ता क्र. 7 : वैवाहिकदर्जा आणि लग्नासाठी जातीची निवड :**

| वैवाहिक स्थिती | जातीचे पर्याय | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | जातीअंतर्गत | आंतरजातीय | उच्च जातीमध्ये आंतर जातीय | |
| घटस्फोटीत | 15 | 10 | 10 | 35 |
| | 42.9% | 28.6% | 28.6% | 100.0% |
| अविवाहीत | 96 | 79 | 37 | 212 |
| | 45.3% | 37.3% | 17.5% | 100.0% |
| विधवा | 1 | 0 | 0 | 1 |
| | 100.0% | .0% | .0% | 100.0% |
| एकूण | 112 | 89 | 47 | 248 |
| | 45.2% | 35.9% | 19.0% | 100.0% |

विवाहासाठी जातीची निवड करण्याबाबत वैवाहिक दर्जाचा काही परिणाम होतो काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी निवडलेल्या नमुन्याची वैवाहिक दर्जानुसार वर्गवारी केली आहे. यात विवाह न झालेले, घटस्फोटीत व विधवा अथवा विधुर असे तीन वर्ग केले आहेत. घटस्फोटीत व विधवा अथवा विधुर असा वैवाहिक दर्जा असेल तर जातीबाहेर विवाह करण्याची शक्यता वाढते असे गृहीतक यामागे आहे.लग्नासाठी जातीची निवड करण्याबाबत वैवाहिक दर्जाचा काही परिणाम तपासला असता असे लक्षात येते की, जातींतर्गत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाणसरासरीच्या (४५.२ %) तुलनेत विवाह न झालेले, घटस्फोटीत यांचे प्रमाण जवळपास सरासरी इतकेच आहे.तसेच कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाणसरासरीच्या (३५.९ %) तुलनेतविवाह न झालेले , घटस्फोटीत यांचे प्रमाण जवळपास सरासरी इतकेच होते.विधुरविवाहेच्छूकांचीसंख्याकेवळएकअशीअपवादात्मकहोतीम्हणूनत्याचाविचारविश्लेषणातकेलानाही.यानिरीक्षणावरूनअसे म्हणतायेईल की **वैवाहिक दर्जाचा लग्नासाठी जातीची निवड करण्यावर काही परिणाम होत नाही.**

**निष्कर्ष :**

१. लिंग आणि लग्नासाठी जातीची निवड यांचा संबंध पहिला असता जातीत विवाह करण्याचे पुरुषांचे प्रमाण स्त्रियां पेक्षा कमी आहे यापेक्षा अधिक काही याबाबत म्हणता येत नाही.त्यामुळे लिंग या घटकाचा लग्नासाठी जातीची निवड करताना विशेष परिणाम होतो असे म्हणता येत नाही.

२. वय आणि लग्नासाठी जातीची निवड संबंध पहिला असता ३६ ते ५० या वयोगटात जातीत विवाह करण्याचे प्रमाण कमी होते तर इतर कोणत्याही जातीत विवाह करण्याचे प्रमाण वाढते .यावरून वय या घटकाचा लग्नासाठी जातीची निवड करताना विशेष परिणाम होतो असे म्हणता येते .
३. जात आणि लग्नासाठी जातीची निवड यांचा संबंध पहिला असता कोणत्याही जातीत विवाह करण्याची ईच्छा असलेल्या विवाहेच्छूकांचे प्रमाण सरासरी ३५.९% होते ही बाब उल्लेखनीय आहे.असे असले तरी उच्च जातींमध्ये जातीतच अथवा उच्च जातीत विवाह करण्यची मानसिकता दिसते.कनिष्ठ जातीमध्ये कोणत्याही जातीत विवाह करण्याची मानसिकता उच्च जातींपेक्षा अधिक आहे. याचा अर्थ जातीची मानसिकता थोडीच कमी झाली आहे. परंतु जात नष्ट झाली आहे असे म्हणणे शक्य नाही.
४. वर्ग (उत्पन्न गाट) आणि लग्नासाठी जातीची निवड यांचा संबंध पहिला असता जसजसा वर्गाचा दर्जा वाढत जातो तसतसा जातीचा विचार कमी होतो असे म्हणता येते.
५. शिक्षण आणि लग्नासाठी जातीची निवड यांचा संबंध पहिला असता जसजसा शैक्षणिक दर्जा वाढत जातो तसतसा जातीचा विचार कमी होतो असे म्हणता येते.
६. वैवाहिक दर्जा आणि लग्नासाठी जातीची निवड यांचा संबंध पहिला वैवाहिक दर्जा असता या घटकाचा लग्नासाठी जातीची निवड करण्यावर काही परिणाम होत नाही.

संदर्भ :

१. **आंबेडकर बी .आर. १९३६, अँनिहीलेशन ऑफ कास्ट ,डॉ आंबेडकर रायटिंग अँड स्पीचेस खंड १,महाराष्ट्र राज्य.**
२. **दैनिक लोकसत्ता, पुणे.**